महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

रविवार ■ १८ जानेवारी २०२६ ■ वर्ष - सातवे ■ अंक : २०३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## संपादकीय

### घराणेशाही नाकारत नव्याना संधी

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे निकाल हे नेहमीच राज्य व देशाच्या राजकारणाची नाडी तपासणारे असतात. भिवंडी-निजामपूर महापालिकेच्या निवडणूक निकालांनी हे पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. मोठी नावे, राजकीय वारसा, घराणेशाही आणि प्रस्थापित नेत्यांचे वलय झुगारून मतदारांनी थेट स्थानिक प्रश्न, कामगिरी आणि नवे चेहरे यांना पसंती दिली आहे. हा निकाल केवळ एका शहरापुरता मर्यादित नसून, तो संपूर्ण राज्यातील राजकारणासाठी महत्त्वाचा संदेश देणारा आहे.

लोकशाहीत सत्ता ही वारशाने नव्हे, तर जनतेच्या विश्वासाने मिळते, हे मतदारांनी ठामपणे दाखवून दिले आहे. आमदारांचे पुत्र, माजी उपमहापौरांची मुले, अनुभवी नेत्यांचे निकटवर्तीय अशा अनेक उमेदवारांचा पराभव हा केवळ व्यक्तीगत अपयश नसून, राजकीय मानसिकतेवरील जनतेचा रोष आहे. वर्षानुवर्षे सत्ता उपभोगूनही स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष करणाऱ्या नेतृत्वाला मतदारांनी यावेळी थेट नकार दिला.

पाणी, रस्ते, वाहतूक, स्वच्छता, शिक्षण, रोजगार, अतिक्रमण आणि नागरी सुविधांचा अभाव हे प्रश्न भिवंडी-निजामपूरकरांसाठी रोजचे वास्तव आहेत. निवडणुकीच्या काळात मोठे भाषण, पक्षाचे झेंडे किंवा वरिष्ठ नेत्यांचे फोटो उपयोगी पडत नाहीत, हे या निकालांनी स्पष्ट केले. “नाव मोठे असो वा लहान, काम दिसले पाहिजे” हीच मतदारांची भूमिका ठरली. या निकालातून राजकीय पक्षांसाठीही स्पष्ट धडा आहे. उमेदवार ठरवताना केवळ निष्ठा, ओळख किंवा वंश नव्हे, तर त्याची स्थानिक कामगिरी, जनसंपर्क आणि विश्वासार्हता महत्त्वाची ठरणार आहे. अन्यथा पक्ष कितीही मोठा असला, तरी मतपेटीत त्याचा पराभव अटळ आहे.

नवे चेहरे निवडून येणे ही लोकशाहीसाठी सकारात्मक बाब आहे; मात्र त्यांच्यापुढेही मोठी जबाबदारी आहे. केवळ घराणेशाहीला नाकारले म्हणून विजय मिळवला, एवढ्यावर थांबून चालणार नाही. जनतेने दाखवलेला विश्वास टिकवण्यासाठी प्रामाणिक काम, पारदर्शक कारभार आणि स्थानिक प्रश्नांवर ठोस निर्णय आवश्यक आहेत.

भिवंडी-निजामपूरचा निकाल एक स्पष्ट संदेश देतो— लोकशाहीत अंतिम मालक मतदार आहे. सत्ता कोणाच्याही घरची मक्तेदारी नाही. जनतेच्या प्रश्नांकडे कानाडोळा करणाऱ्यांना बाहेरचा रस्ता दाखवण्यात मतदार अजिबात मागेपुढे पाहणार नाहीत. हेच या निवडणुकीचे खरे संपादकीय आहे.

# मुंबईच्या महापौरपदावर संघर्ष नाही

## समन्वयातूनच निर्णय होणार! - देवेंद्र फडणवीस



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १७ (मुंबई) : मुंबई महानगरपालिकेच्या महापौरपदावरून कोणताही वाद निर्माण होणार नाही. महापौरपदाचा निर्णय उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मी आणि भाजप-शिवसेना या दोन्ही पक्षांचे वरिष्ठ नेते एकत्र बसून घेऊ, अशी स्पष्ट माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली.**

राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे निकाल जाहीर होत असताना संपूर्ण राज्यासह देशाचे लक्ष मुंबई महानगरपालिकेच्या निकालांकडे लागले होते. या निवडणुकीत भाजप आणि शिवसेना यांच्या महायुतीने स्पष्ट बहुमत मिळवत मुंबई महापालिकेवर सत्ता स्थापन करण्याचा मार्ग मोकळा केला आहे. तब्बल २५ वर्षांनंतर मुंबई महापालिकेत सत्तांतर होत असल्याने या निकालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या निवडणुकीत भाजपने ८९ जागांवर विजय मिळवत सर्वात मोठा पक्ष म्हणून आपली ताकद सिद्ध केली आहे. तर महायुतीतील शिवसेना ने २९ जागांवर विजय मिळवत सत्तेत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. दुसरीकडे उद्धव बाळासाहेब ठाकरे गट आणि राज ठाकरे यांच्या मनसेच्या आघाडीने ७० हून अधिक जागांवर विजय मिळवत विरोधी बाकांवरही भक्कम उपस्थिती निर्माण केली आहे. या निकालानंतर मुंबईचा पुढील महापौर कोण होणार, याबाबत राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. शिवसेनेतील काही नवनिर्वाचित नगरसेवक आणि नेत्यांनी महापौरपदासाठी आपली अपेक्षा व्यक्त केली होती. याबाबत प्रसारमाध्यमांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारणा केली असता, त्यांनी कोणताही वाद होणार नसल्याचे स्पष्ट शब्दांत सांगितले. महापौरपदाचा निर्णय एकमताने घेतला जाईल, असे सांगत फडणवीस म्हणाले की, मुंबई महापौरपदाबाबत लवकरच बैठक घेऊन सविस्तर चर्चा केली जाईल. महापौर कोण असेल, कार्यकाळ किती असेल आणि सत्तेचे नियोजन कसे असेल, याचा निर्णय परस्पर समन्वयातून घेतला जाईल. मुंबईसारख्या देशाच्या आर्थिक राजधानीत स्थिर आणि सक्षम प्रशासन देणे ही महायुतीची प्राथमिकता असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कोणताही अंतर्गत संघर्ष न करता भाजप आणि शिवसेना एकत्रितपणे मुंबईचा विकास, पायाभूत सुविधा आणि नागरी समस्या सोडवण्यासाठी काम करतील, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला.

### आ.किसन कथोरेंची राजकीय खेळी

# शिवसेनेचे प्रवीण राऊत भाजपाच्या वाटेवर?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १७**

**बदलापूर :** मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसह राज्यात शिवसेनेला अवघ्या काही महापालिकापर्यंत मर्यादित ठेवण्याची खेळी भाजपने केली. कुळगाव बदलापूर नगरपालिका निवडणुकीत शिंदेच्या शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यात भाजपला यश आले. येथे नगराध्यक्ष पदावर शिवसेनेला पाणी सोडावे लागले. भाजपने एकहाती सत्ता मिळवत येथे शिवसेनेला धक्का दिला. यात आमदार किसन कथोरे यांनी महत्वाची भूमिका बजावली. त्यानंतर आता आमदार किसन कथोरे आणखी एक मोठी खेळी करण्यासाठी रणनीती आखत आहेत.

शिवसेनेच्या वतीने स्वीकृत नगरसेवक निवडीत एकतर्फी निर्णय घेतल्याचा आरोप शिवसेनेच्याच विजयी नगरसेवक आणि पराभूत उमेदवारांनी घेतला होता. त्याच नाराज आणि पराभूत उमेदवारांना गळाला लावण्यासाठी भाजप आमदार किसन कथोरे यांनी खेळी केली असून लवकरच शिवसेनेतील महत्वाचा पदाधिकारी भाजपात प्रवेश घेणार आहे. यामुळे शिंदेंच्या शिवसेनेला मोठा फटका बसणार असून त्याचे दूरगामी परिणाम होतील अशी शक्यता आहे.

कुळगाव बदलापूर नगरपालिका निवडणुकीत शिंदेच्या शिवसेनेला सर्वाधिक नगरसेवक मिळाले. मात्र भाजपने निवडणुकीपूर्वीच अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षासोबत युती केली होती. त्याचा भाजपला थेट फायदा झाला. भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवाराला राष्ट्रवादीची हक्काची मते मिळाली. त्यामुळे भाजपच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रुचिता घोरपडे विजयी झाल्या. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे तीन नगरसेवक निवडून आले. त्यामुळे भाजपचे संख्याबळ २२ असले तरी राष्ट्रवादीच्या तीन नगरसेवकांमुळे त्यांच्या युतीचे संख्याबळ २५ वर पोहोचले. त्यातच भाजपच्या वतीने तुषार आपटे यांना संधी दिल्याने राज्यभर चर्चा झाली. परिणामी त्यांना राजीनामा द्यावा लागला. त्यामुळे भाजपची स्वीकृत नगरसेवकाची एक जागा रिक्त आहे.

हीच संधी ओळखून आमदार किसन कथोरे यांनी एकच दगडात अनेक पक्षी मारण्याची खेळी केली. त्यांनी शिवसेनेचे प्रवीण राऊत यांना गळाला लावण्यासाठी रणनीती आखली. त्यात त्यांना यश आले असून रविवारी प्रवीण राऊत त्यांच्या समर्थकांसह भाजपात प्रवेश करण्याची शक्यता आहे. तसे संदेश राऊत समर्थक समाज माध्यमांवर प्रसारित करत आहेत. त्यामुळे राऊत भाजपात गेल्यास हा शिवसेनेला मोठा धक्का मानला जातो आहे. राऊत हे बहुजन समाजाचे नेते मानले जातात. त्यांच्या मागे मोठा आंबेडकरी अनुयायांचे समर्थन आहे. त्याचा पुढील राजकारणात भाजपला मोठा फायदा होऊ शकतो, असे बोलले जाते.

# कल्याण-डोंबिवलीत महापौरपदासाठी रस्सीखेच

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण / दि. १७ कल्याण-डोंबिवली महापालिका निवडणुकीचे निकाल जाहीर झाले असून महायुतीने सत्तेचा मार्ग मोकळा केला आहे. मात्र शिंदेच्या शिवसेनेच्या ५३ आणि भाजपच्या ५० जागांमधील तुटक फरकामुळे महापौरपदासाठी खरी रस्सीखेच सुरू झाली आहे. दोन्ही पक्षांनी अपक्ष आणि इतर छोट्या पक्षांमधील नगरसेवकांना स्वतःच्या बाजूने आणण्यासाठी फिल्डिंग सुरू केली असून, यामुळे महापौरपदावर संघर्षाचा नवा अध्याय सुरू होण्याची चिन्हे दिसत आहेत.**

सत्तेचे गणित जुळवण्यासाठी फोडाफोडीचे राजकारण सध्या सुरु आहे. मनसेच्या तिकिटावर निवडून आलेल्या शीतल मंढारी यांनी भाजप आमदार सुलभा गायकवाड यांच्यासोबत विजय साजरा केल्याने त्या भाजपला साथ देण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर ठाकरे गटाचे डोंबिवलीत संघाने निर्णायक भूमिका बजावली. विष्णूनगरसारख्या संवेदनशील भागात संघाच्या नियोजनामुळे भाजपला यश मिळाले. विशेष म्हणजे भाजपने डोंबिवलीतून १४ उमेदवार बिनविरोध निवडून आणले असून, त्यातून पक्षाची संघटनात्मक ताकद सिद्ध झाली

### सत्ता स्थिरतेसाठी दोन्ही पक्षांमध्ये मोठा खेळ

मधुर म्हात्रे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट घेतल्याची चर्चा आहे, तसेच स्वप्नाली केणे आणि अन्य एक नगरसेवक राज ठाकरेंच्या भेटीला गेले असल्याची माहिती मिळत आहे.

भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रतिष्ठेच्या असलेल्या आहे. राजकीय समीकरणांच्या बदलामुळे महापौरपद आणि युतीच्या भवितव्यातील निर्णय महत्त्वाचे ठरतील, आणि पुढील काही दिवसांत महापालिकेतील सत्ता स्थिरतेसाठी दोन्ही पक्षांमध्ये मोठा खेळ सुरू राहणार असल्याचे जाणकारांचे म्हणणे आहे.




## महत्वाचे

### निवडणूक कर्तव्यावरील एसटीच्या डिझेलची चोरी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १८**

**ठाणे :** निवडणूक बंदोबस्तासाठी पोलिसांना ने-आण करण्यासाठी ठाण्यात आलेल्या दोन एसटी बसमधून डिझेल चोरीला गेल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. ही घटना कळव्यातील खारेगाव टोलनाका परिसरात घडली असून, चोरट्यांनी दोन्ही बसमधून एकूण ३०० लिटर डिझेल चोरले. या प्रकरणी चार अज्ञात आरोपीविरुद्ध कळवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. धुळे जिल्ह्यातील शहादा आगारातून योगेश माळी आणि किरण जावरे हे चालक दोन एसटी बस घेऊन निवडणूक कर्तव्यासाठी ठाण्यात आले होते. मुलुंड ते नंदुरबार पोलिसांना ने-आण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर होती. १७ जानेवारीला पहाटे सुमारे ३ वाजण्याच्या सुमारास किरण जावरे यांना डिझेलचा तीव्र वास आल्याने जाग आली. बाहेर पडून पाहिले असता, चार जण दोन्ही बसच्या टाकीतून डिझेल काढताना दिसले. जावरे यांना पाहताच चोरट्यांनी चारचाकी कार आणि दुचाकीवरून पळ काढला. विशेष म्हणजे चोरीसाठी वापरलेल्या या वाहनांवर नंबर प्लेट नव्हती. दोन्ही बसमधून प्रत्येकी १५० लिटर डिझेल चोरीला गेले असून, अंदाजे किंमत २७ हजार रुपये आहे. चालक योगेश माळी यांच्या तक्रारीवरून कळवा पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

### उल्हासनगरमध्ये वंचित काँग्रेस किंगमेकर!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** उल्हासनगर पालिका निवडणुकीत महायुती फिस्कटल्याने शिवसेना, ओमी कलानी व साई पक्षाची आघाडी आणि भाजपमध्ये थेट लढत झाली. त्यामुळे दोन्ही पक्षांना प्रत्येकी ३७ जागा मिळाल्या. वंचितला दोन आणि काँग्रेसने केवळ एका जागेवर विजय मिळविला आहे. ठाकरे बंधूना खातेही उघडता आले नाही; मात्र तरीही सत्तेचे गणित जुळवण्यासाठी काँग्रेस, वंचित आणि इतरांची भूमिका निर्णायक असणार आहे. मागील निवडणुकीत किंगमेकरच्या भूमिकेत राहिलेल्या साई पक्षाला यंदा अपेक्षित यश मिळाले नाही. साई पक्षाने शिवसेना शिंदे आणि टीम ओमी कलानीसोबत आघाडी केली, तरी अनेक ठिकाणी 'साई' पुढे टीम कलानीचे उमेदवार शिवसेनेच्या चिन्हावर रिंगणात होते. त्यामुळे मतविभागणी होऊन त्याचा फटका साईला बसला.

# पोलिसांसाठी ४५ हजार घरे

## राज्य सरकारचा निर्णय

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १७ (मुंबई) :**

मुंबई शहर आणि उपनगरातील पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४५ हजार शासकीय निवासस्थानं बांधायला आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. तसंच, शिवडी न्हावाशेवा अटल सेतूच्या टोलशुल्काला आणखी एक वर्षभर सवलत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. मुंबईत नागरी परिवहन प्रकल्प टप्पा दोनसाठीच्या सुधारित खर्चाला मंजुरी देण्यात आली. राज्यातल्या युवकांना परदेशात रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र व्यापक आंतरराष्ट्रीय गतीशिलता आणि क्षमता संस्था स्थापन करायलाही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली. भाजीपाला निर्यातीकरता शेतकऱ्यांसाठी ठाणे जिल्ह्यातील मौजे बापगांव इथे मल्टी मॉडेल हब आणि टर्मिनल मार्केटची उभारणी करण्यात येणार आहे. त्यासाठी कृषी पणन महामंडळाला ७ हेक्टर जमीन उपलब्ध करून दिली जाणार आहे. यवतमाळ जिल्ह्यातील बेंबळा नदी प्रकल्पासाठी ४ हजार ७७५ कोटी रुपयांच्या निधीला मान्यता देण्यात आली आहे.

### भिवंडीतील राजकीय वंशजांना पराभवाचा धक्का

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १७ (भिवंडी)**

भिवंडी-निजामपूर महापालिका निवडणुकीच्या निकालांनी प्रस्थापित राजकारण्यांना मोठा धक्का दिला आहे. परंपरागत राजकीय गणिते, पक्षांचे मोठे वलय आणि घराणेशाहीला नाकारत मतदारांनी स्थानिक प्रश्न आणि नव्या चेहऱ्यांवर विश्वास दर्शविला आहे. भाजप आमदारांच्या पुत्रापासून ते माजी उपमहापौरांच्या मुलांपर्यंत अनेकांना या निवडणुकीत पराभवाचा कडू घास घ्यावा लागला आहे. भिवंडी पश्चिमचे भाजप आमदार महेश चौघुले यांचे पुत्र मित महेश चौघुले यांचा कोणार्क आघाडीचे उमेदवार ॲड. मयूरेश पाटील यांनी १,६९७ मतांनी पराभव केला. समाजवादी पक्षाचे माजी उपमहापौर अहमद हुसेन सिद्दीकी यांची मुले अमिर आणि अविश सिद्दीकी यांना शरद पवार गटाकडून पराभवाचा धक्का बसला. शिंदे शिवसेनेचे माजी आमदार रूपेश म्हात्रे यांचे बंधू संजय लक्ष्मण म्हात्रे यांना काँग्रेसचे तारिक मोमीन यांनी ९,०५४ मतांच्या मोठ्या फरकाने पराभूत केले. भाजपचे माजी शहराध्यक्ष आणि माजी विरोधी पक्षनेते श्याम अग्रवाल यांचा प्रभाग २२मध्ये अपक्ष उमेदवार नितेश ऐनकर यांनी अवघ्या २१ मतांच्या निसटत्या फरकाने पराभव केला आहे.

# ठाण्यात भाजप विरोधी पक्षाची भूमिका बजावणार?

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १७ (ठाणे) :**

ठाणे महापालिकेच्या निवडणुकीत महायुतीला शंभरहून अधिक जागा मिळाल्या असल्या तरी, त्यात शिंदे गटाच्या शिवसेनेने स्वबळावर बहुमताचा आकडा पार केल्याचे स्पष्ट झाले आहे. अशा परिस्थितीत भाजपाचे आमदार संजय केळकर आणि निरंजन डावखरे यांनी केलेल्या सूचक विधानामुळे राजकीय वर्तुळात नव्या चर्चांना उधाण आले आहे. ठाणेकरांच्या हितासाठी तसेच निवडणुकीत दिलेली आश्वासने पूर्ण करण्यासाठी वेळप्रसंगी वेगळी भूमिका घेऊ, असे त्यांनी स्पष्ट संकेत दिले आहेत. यामुळे महापालिकेत भाजप विरोधी पक्षाची भूमिका बजावणार का, अशी चर्चा रंगू लागली आहे.

ठाणे महापालिकेच्या एकूण ३३ प्रभागांतील १३१ जागांसाठी नुकतीच निवडणूक पार पडली. या निवडणुकीत शिंदे गटाच्या शिवसेनेचे ७५, भाजपाचे २८, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) १२, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) ९, एमआयएम ५, शिवसेना (उबाठा) १ आणि १ अपक्ष असे एकूण १३१ नगरसेवक निवडून आले आहेत. पालिकेत सत्तास्थापनेसाठी ६७ नगरसेवकांचा आकडा आवश्यक असून, शिंदे गटाच्या शिवसेनेने हा ‘जादुई आकडा’ स्वबळावर गाठल्याचे चित्र आहे. जरी ही निवडणूक शिंदे गटाची शिवसेना आणि भाजपाने युतीत लढवली असली, तरी सत्तास्थापनेत शिंदे गटाची शिवसेना आघाडीवर आहे. सध्या दोन्ही पक्ष एकत्र सत्तास्थापन करतील आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) विरोधी पक्षाची भूमिका निभावेल, अशी चर्चा आहे. मात्र, भाजप आमदारांच्या सूचक विधानांमुळे ठाणे महापालिकेतील सत्तासमीकरणांबाबत उत्सुकता वाढली आहे.




# जिल्हा परिषद निवडणुका राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्रित लढणार!

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता**

**प्रतिनिधी / दि. १७ (मुंबई)**

पुणे महानगरपालिकेतल्या निवडणुकीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार हे दोन्ही पक्ष पुन्हा एकदा आगामी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका एकत्रितपणे लढवणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांनी काल पुण्यात ही माहिती दिली. शशिकांत शिंदे यांनी बारामती इथं शरद पवार यांची भेट घेतली. त्यानंतर झालेल्या वरिष्ठ नेत्यांच्या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, खासदार सुप्रिया सुळे, जयंत पाटील आणि इतर नेते उपस्थित होते, अशी माहिती त्यांनी दिली. महानगरपालिका निवडणुकीतील पराभवाचं आत्मचिंतन करून दोन्ही पक्ष नव्या दमानं पुढे जातील, असं ते म्हणाले.

### मुंबई महापालिका २०२६

# महायुतीवर सत्तेचा दबदबा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** मुंबई महापालिकेच्या निकालांनी महाराष्ट्रातील नगरीय राजकारणाची दिशा स्पष्ट केली आहे. तब्बल पंचवीस वर्षांनंतर ठाकरे गटाची सत्ता संपुष्टात येत महायुतीने मुंबईवर निर्णायक पकड मिळवली आहे. ही केवळ सत्तांतराची घटना नसून, शहरी मतदारांच्या प्राधान्यक्रमात झालेल्या बदलाचेही द्योतक आहे.

भाजपने ८९ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष होण्याचा मान पटकावला, तर शिवसेना (शिंदे गट) २९ जागांसह सत्तेत निर्णायक भागीदार ठरली. यामुळे महायुतीतील सत्तासमीकरण स्पष्ट असले तरी महापौरपदावर अंतिम निर्णय समन्वयातून घेण्याची भूमिका मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मांडली आहे. यामागे महायुतीतील अंतर्गत संतुलन राखण्याचा राजकीय हेतू स्पष्टपणे दिसतो.

दुसरीकडे, उबाठा गट आणि मनसेची आघाडी ७० हून अधिक जागा जिंकत विरोधी बाकांवर मजबूत झाली आहे. सत्ता गेली असली तरी संपूर्णपणे हद्दपार न होता त्यांनी प्रभावी विरोधाची भूमिका निर्माण केली आहे. आगामी काळात मुंबई महापालिकेतील चर्चा, निर्णय आणि आंदोलनांमध्ये ही आघाडी सक्रिय राहण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या निकालांचे महत्त्व केवळ मुंबईपुरते मर्यादित नाही. राज्यातील २९ महापालिकांमध्ये महायुतीला मिळालेल्या यशामुळे 'विकासाचा अजेंडा' हा शहरी मतदारांसाठी निर्णायक ठरत असल्याचे संकेत मिळतात. दीर्घकाळ सत्तेत असलेल्या पक्षांविरोधात असंतोष, स्थानिक प्रश्न, पायाभूत सुविधा आणि प्रशासनातील कार्यक्षमतेचा थेट मतदानावर परिणाम होत असल्याचे चित्र आहे.

महापौरपदाचा निर्णय जरी सामंजस्यातून होणार असला, तरी तो निर्णय महायुतीतील शक्तिसंतुलन, आगामी विधानसभा आणि लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. मुंबईचा महापौर हा केवळ प्रशासकीय पद न राहता, राज्याच्या राजकारणातील दिशादर्शक मानला जातो. त्यामुळे हा निर्णय महायुतीसाठी एक परीक्षा ठरणार असून, विरोधकांसाठी नव्या रणनीती आखण्याची सुरुवात ठरेल.

# मनसेच्या नवनिर्वाचित नगरसेवकांनी घेतली राज ठाकरेंची भेट

## शर्मिला ठाकरे यांनी केले नगरसेवकांचे औक्षण

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणूक पार पडली असून या निवडणुकीत मनसेचे 5 नगरसेवक निवडून आले आहेत. या नगरसेवकांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची शिवतीर्थ येथे भेट घेतली. यावेळी राज ठाकरे यांच्या पत्नी शर्मिला ठाकरे यांनी या विजयी उमेदवारांचे औषण करत शुभेच्छा दिल्या. यावेळी मनसेचे गणेश लांडगे, शीतल मंढारी, प्रल्हाद म्हात्रे, संदेश पाटील, रसिका पाटील हे



नवनिर्वाचित नगरसेवक तसेच मनसेचे राहुल कोट यांनी आणि मनविसेचे शहर अध्यक्ष विनोद केणे यांच्या पत्नी स्वप्नाली केणे यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या चिन्हावर निवडणूक लढवत विजय प्राप्त केला. त्यांनी देखील राज ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी मनसे नेते माजी आमदार राजू पाटील, कल्याण पूर्व विधानसभा अध्यक्ष निर्मल निगडे, विनोद केणे, हर्षद पाटील, अरुण जांभळे, सचिन पोपलाईत आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# कल्याण डोंबिवली मनपा शिक्षकांचे उल्लेखनीय यश

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** १ सप्टेंबर २०२५ च्या सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णया अन्वये पाच वर्षापेक्षा जास्त सेवा शिल्लक असलेल्या सर्व माध्यमाच्या, सर्व शिक्षकांना शिक्षक पात्रता परीक्षा (TET) उत्तीर्ण असणे अनिवार्य होते.

ही अट रद्द करण्यासाठी बऱ्याच मोठ्या प्रमाणात आंदोलने झाली. अशावेळी कल्याण डोंबिवली मनपा शिक्षण विभागात सेवेत कार्यरत असलेल्या शिक्षकांनी याला संधी समजून आव्हान पेलण्याचे ठरवले. त्यावेळी आपले दैनंदिन कामकाज आणि शाळेतील कामांवर कोणताही परिणाम होऊ न देता २३ नोव्हेंबर २०२५ रोजी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,पुणे यांनी आयोजित केलेल्या शिक्षक पात्रता परीक्षेसाठी महापालिकेच्या ३५ शिक्षकांनी अर्ज दाखल केले आणि दि. १६ जानेवारी २०२६ रोजी लागलेल्या निकालात त्यातील २१ शिक्षक पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झाले. सामान्यपणे या परीक्षेचा निकाल ३ ते ४ % इतका लागतो. असे असताना कल्याण डोंबिवली महापालिका शाळातील ३५ पैकी २१ म्हणजे ६०% शिक्षकांनी पहिल्याच प्रयत्नात हे उज्वल यश प्राप्त केले. विशेष म्हणजे ५ शिक्षक इयत्ता १ ते ५ व इयत्ता ६ ते ८ असे दोन्ही पेपर देऊन उत्तीर्ण झाले आहेत. यासाठी महापालिकेचे प्रशासन अधिकारी भारत बोरनारे आणि शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांनी सातत्याने प्रोत्साहन दिले. त्यामुळे कल्याण डोंबिवली महापालिका शाळांमधील शिक्षकांनी उल्लेखनीय यश मिळवून एक उदाहरण घालून दिले आहे असे म्हणण्यास हरकत नाही.

# ठाण्यात भाजपचा विजय

## २८ पैकी २८ जागा जिंकून जनतेचा विश्वास सिद्ध

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे :** ठाणे महानगरपालिकेच्या नुकत्याच पार पडलेल्या निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाच्या उमेदवारांना मिळालेल्या घवघवीत यशानंतर आज ठाण्यात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली. या पत्रकार परिषदेला भाजप आमदार संजय केळकर, आमदार निरंजन डावखरे, प्रदेश महामंत्री माधवी नाईक, ठाणे शहराध्यक्ष संदीप लेले यांच्यासह ठाणे महानगरपालिकेत विजयी झालेल्या पक्षाच्या बहुसंख्य उमेदवारांची उपस्थिती होती.

यावेळी आमदार संजय केळकर यांनी ठाणेकर मतदारांचे मनःपूर्वक आभार मानले. जनतेने भारतीय जनता पक्षावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल कृतज्ञता व्यक्त करत त्यांनी माध्यमांचेही सकारात्मक व वस्तुनिष्ठ वार्तांकनासाठी विशेष आभार मानले.

आमदार निरंजन डावखरे यांनी पत्रकार परिषदेत निकालांचे सविस्तर विश्लेषण मांडले. त्यांनी सांगितले की, भाजपने एकूण ३८ जागा लढवून त्यापैकी २८ जागांवर विजय मिळवला असून हा स्ट्राइक रेट अत्यंत उल्लेखनीय आणि समाधानकारक आहे. विशेष बाब म्हणजे, मूलभूतपणे भाजपसाठी पारंपरिक नसलेल्या मुंब्रा आणि



**आमदार निरंजन डावखरे यांनी पत्रकार परिषदेत निकालांचे सविस्तर विश्लेषण मांडले. त्यांनी सांगितले की, भाजपने एकूण ३८ जागा लढवून त्यापैकी २८ जागांवर विजय मिळवला असून हा स्ट्राइक रेट अत्यंत उल्लेखनीय आणि समाधानकारक आहे.**

राबोडीसारख्या भागांत पक्षाने १० जागा लढवल्या. त्या जागा वगळता पाहता, भाजपचा प्रभावी स्ट्राइक रेट हा थेट २८ पैकी २८ असा म्हणजेच १००% ठरतो, जो पक्षाच्या संघटनात्मक ताकदीचे आणि जनतेच्या विश्वासाचे स्पष्ट द्योतक आहे. यावेळी आमदार निरंजन डावखरे यांनी या यशामागील प्रेरणास्रोत असलेल्या आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या दूरदृष्टीपूर्ण नेतृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या ठाम निर्णयक्षमतेमुळे आणि विकासाभिमुख धोरणांमुळे राज्यात भारतीय जनता पक्षाविषयी जनतेचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे त्यांनी नमूद केले. यासोबतच महाराष्ट्र प्रदेश भाजप अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिलेले सातत्यपूर्ण मार्गदर्शन, संघटनात्मक बळकटी आणि कार्यकर्त्यांशी असलेला थेट संवाद यामुळेच ठाण्यात हे घवघवीत यश मिळू शकले, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ठाणे शहराध्यक्ष संदीप लेले यांनी या यशाचे श्रेय पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांच्या मेहनतीला दिले.

पत्रकार परिषदेत उपस्थित सर्व विजयी उमेदवारांनी ठाणेकरांच्या अपेक्षांनुसार प्रामाणिक, पारदर्शक आणि विकासाभिमुख काम करण्याचा निर्धार व्यक्त केला.

# जीवनदीपच्या व्यवस्थापन शाखेच्या विद्यार्थ्यांची पार्ले जी कंपनीला औद्योगिक भेट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**अंबरनाथ :** जीवनदीप महाविद्यालयात सक्रिय असणारा व्यवस्थापन विभाग; या विभागाची मंगळवार दिनांक १३- ०१- २६ रोजी अंबरनाथ येथील पार्लेजी कंपनीला औद्योगिक भेट देण्यात आली या औद्योगिक भेटीदरम्यान ३० विद्यार्थी उपस्थित होते. व्यवस्थापन विभाग प्रमुखः प्रा. उल्हास गायकर, प्रा.निकिता घोडविंदे, प्रा. शैलजा मिश्रा हे प्राध्यापक उपस्थित होते . पार्ले जी ही भारतातील अग्रगण्य बिस्कीट कंपन्या पैकी एक आहे;




श्री. निशिकांत पाठक यांनी कंपनीची माहिती विद्यार्थ्यांना योग्य प्रकारे समजावून सांगितली व कंपनीच्या यशाबाबत विद्यार्थ्यांना माहिती सांगितली. कंपनीची एच आर प्रणाली, उत्पादन प्रक्रिया, पॅकेजिंग आणि वितरण याबाबत विस्तृत स्वरूपात माहिती ही विद्यार्थ्यांना या औद्योगिक भेटीदरम्यान मिळाली या गोष्टीचा विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यात, व्यवस्थापनात पुढे नक्कीच फायदा होईल. विद्यार्थ्यांना पार्ले जी बिस्किटाचे पॅकेट देऊन सदर अभ्यास दौऱ्याची सांगता करण्यात आली. जीवनदीप संस्थेचे.अध्यक्ष .रविंद्र घोडविंदे , संचालक. प्रशांत घोडविंदे प्राचार्य. डॉ. अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे, यांचे मोलाचे सहकार्य सदर औद्योगिक भेटीदरम्यान लाभले.

# उत्कर्ष महाविद्यालयात विविध पदवी, पदविका व SAP समुपदेशन व प्रवेश केंद्राचे उद्घाटन!

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण :** समाज हितकारिणी संस्था संचलित उत्कर्ष कला वाणिज्य विज्ञान (आय टी ) महाविद्यालय भातसई - वाशिंद येथे प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पदवी, पदव्युत्तर, पदविका व SAP कोर्सचे उद्घाटन आज मोठ्या थाटामाटात संपन्न करण्यात आले. मंगलायतन विद्यापीठ अंतर्गत रोजगार व करिअर मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने ऑनलाइन मोडवर आधारित पदवीमध्ये बीए, बीकॉम, बीबीए , बीसीए आणि बिलीब तसेच पदव्युत्तर कोर्समध्ये एम ए, एम कॉम , एमबीए आणि एमसीए तसेच SAP चे ऑनलाइन व ऑफलाइन मोड वर कोर्सचे सुपदेशन व प्रवेश केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उद्घाटन प्रसंगी डॉ. सोन्या काशिनाथ पाटील (अध्यक्ष समाज कल्याण, न्यास महाराष्ट्र राज्य)



व तसेच मा. अड. पी. सी. पाटील (अध्यक्ष ज्ञान विकास संस्था नवी मुंबई) रोजगार करियर मार्गदर्शन केंद्राचे संचालक श्रेयस कुलकर्णी हे प्रमुख मान्यवर पाहुणे उपस्थित होते. विद्यार्थ्यांना आधुनिक उद्योग जागृती, सुसंगत असे तांत्रिक शिक्षण व शिक्षणाच्या नव्या संधी निर्माण करून त्यांचे करिअर घडवण्यासाठी ही संस्था सातत्याने विविध उपक्रमाचे तसेच विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात टिकून राहण्यासाठी आवश्यक्य असलेले विविध उपक्रमांचे नेहमीच आयोजन करीत असते त्यामुळेच हे महाविद्यालय अल्पावधीतच नावारूपाला आले आहे असे प्रमुख पाहुण्यांनी आपल्या मनोगतातून स्पष्ट केले व संस्थेच्या कार्याचे कौतुक केले. याप्रसंगी शरद फर्डे, किशोर पाटील, रामदास राव, संतोष जाधव, भावेश ठाकरे, सुखदेव जाधव व किशोर फलटणकर तसेच समाज हितकारिणी संस्थेचे अध्यक्ष अरुण विठ्ठल वारघडे, सचिव रामदास शेळके, विश्वास परटोले, वृषाली ताई जाधव, प्रतिमा वारघडे, श्रीमती सुषमा दळवी आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष अरुण वारघडे यांनी भूषवले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य डॉ. शेषराव मसुडकर यांनी केले तर सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. दीपिका बिडवी यांनी केले या कार्यक्रमांमध्ये विद्यार्थी, पालक व माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व संचालक, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक' राज्यात सुरु

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /मुंबई, दि. 16 :-** महिलांचे आरोग्य केंद्रस्थानी ठेवत राज्यातील सर्व शासकीय रुग्णालये तसेच शहरी भागांमध्ये 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्यात आले आहेत. असे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांनी सांगितले.आरोग्य राज्यमंत्री बोर्डीकर म्हणाल्या, मेनोपॉज म्हणजे महिलांच्या आयुष्यातील अत्यंत संवेदनशील टप्पा. या काळात होणारे शारीरिक बदल, मानसिक ताण, हॉर्मोन असंतुलन, हाडांचे आजार, झोपेचे विकार व नैराश्य याकडे आजवर दुर्लक्ष होत होते. हीच गरज ओळखून राज्य शासनाने महिलांसाठी 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आरोग्य राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले की, या क्लिनिकच्या माध्यमातून, तज्ज्ञांकडून वैद्यकीय सल्ला, मानसिक आरोग्य समुपदेशन, हाडे, हृदय व हॉर्मोन तपासणी, औषधोपचार व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येत आहे. देशात प्रथमच अशा प्रकारचे 'मेनोपॉज क्लिनिक' सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे. महिलांच्या आरोग्याबाबत राज्य शासनाने उचललेले हे पाऊल इतर राज्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहे.मेनोपॉज हा आजार नाही, तर महिलांच्या आयुष्यातील एक नैसर्गिक टप्पा आहे. मात्र या टप्प्यात महिलांना शारीरिक आणि मानसिक आधाराची अत्यंत गरज असते. राज्यातील प्रत्येक महिलेला या काळात योग्य सल्ला, उपचार आणि सन्मान मिळावा, यासाठीच मेनोपॉज क्लिनिक सुरू करण्यात आले असल्याचे राज्यमंत्री बोर्डीकर यांनी सांगितले.

# समृद्ध पंचायत राज अभियानाच्या प्रचारासाठी खेवारे ग्रामपंचायतीत सेलिब्रिटी भेट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुरबाड :** राज्य शासनाच्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी तालुका मुरबाडमधील ग्रामपंचायत खेवारे येथे दि. 18 जानेवारी 2026 रोजी प्रसिद्ध सेलिब्रिटी शिवाली परब व पृथ्विक प्रताप हे भेट देणार आहेत. या भेटीच्या पार्श्वभूमीवर ग्रामपंचायत स्तरावर आवश्यक ती तयारी पूर्ण करण्यात आली असून ग्रामस्थांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या माध्यमातून ग्रामपंचायतींच्या सर्वांगीण विकासास चालना देणे, स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार अधिक पारदर्शक व लोकाभिमुख करणे, स्वच्छता, पाणीपुरवठा, डिजिटल सेवा, महिला सक्षमीकरण तसेच कृषी व शाश्वत विकासाशी संबंधित योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे हा




शासनाचा मुख्य उद्देश आहे. या अनुषंगाने जनजागृतीसाठी विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या कार्यक्रमाबाबत माहिती देताना डॉ. लता गायकवाड (गट विकास अधिकारी, पंचायत समिती मुरबाड), लक्ष्मण सुरोशे (विस्तार अधिकारी, पंचायत), श्रीम. नाडेकर (सरपंच, ग्रामपंचायत खेवारे), अंकुश सुरोशे (उपसरपंच), पोलिस पाटील तसेच शेतीतज्ज्ञ डॉ. विलास सुरोशे यांनी सांगितले की, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानामुळे ग्रामपंचायतींच्या प्रशासनात सुधारणा होऊन विकासकामांना गती मिळणार आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग आणि लोकसहभाग हा या अभियानाच्या यशाचा मुख्य आधार असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उपस्थित सेलिब्रिटी ग्रामस्थांशी थेट संवाद साधून अभियानाचे उद्दिष्ट, ग्रामविकासातील नागरिकांची भूमिका तसेच युवक व महिलांचा सहभाग याबाबत मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यक्रमास ग्रामपंचायतीचे पदाधिकारी, अधिकारी-कर्मचारी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. या सेलिब्रिटी भेटीमुळे मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाचा प्रचार अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचेल व ग्रामपंचायत खेवारे विकासाच्या दिशेने एक आदर्श निर्माण करेल, असा विश्वास संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

# भविष्यवेध



**रविवार**
**१८ जानेवारी २०२६**

**मेष**
तुम्हाला नवीन व्यवसाय सुरू करायचा असेल तर तुम्हाला नक्कीच यश मिळेल. स्पर्धात्मक क्षेत्रात प्रगती करण्याची संधी तुम्हाला मिळेल.

**वृषभ**
विद्यार्थ्यांनी त्यांची तयारी सुरू ठेवावी. आज तुम्ही रिअल इस्टेटशी संबंधित कोणतेही काम पूर्ण कराल. कामाच्या ठिकाणी चांगली बातमी मिळेल.

**मिथुन**
स्पर्धेत मुलांना यश मिळाल्यामुळे घरातही आनंदाचे वातावरण असेल. ताण वाढवणाऱ्या कोणत्याही गोष्टीवर जास्त लक्ष देऊ नका, अन्यथा त्रास होईल. तुम्ही

**कर्क**
तुमच्या जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडाल. आज तुमचे कुटुंब तुमची प्रशंसा करेल. तुमच्या वैवाहिक जीवनात आनंद आणि सुसंवाद वाढेल.

**सिंह**
सरकारी क्षेत्रातील लोकांशी चांगला समन्वय ठेवा. स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना लवकरच त्यांच्या मेहनतीचे फळ मिळेल.

**कन्या**
जन्मलेल्या इलेक्ट्रिशियनना त्यांच्या व्यवसायात वाढलेला नफा दिसेल. कोणाचा तरी सल्ला घेणे चांगले राहील. मनात सकारात्मक विचार येतील.

**तुळ**
नवीन काम, जबाबदारी अंगावर घेण्याची उत्सुकता असेल. तुमच्या मित्रांकडून तुम्हाला भरपूर पाठिंबा मिळेल. कामाच्या ठिकाणी नवीन लोक भेटू

**वृश्चिक**
शकतात खाजगी नोकरी करणाऱ्यांना पगार वाढेल, ज्यामुळे तुमची आर्थिक परिस्थिती सुधारेल. आज कुटुंबात आनंद आणि समृद्धी वाढेल.

**धनु**
तुम्ही एखाद्या धार्मिक स्थळी जाण्याची योजना आखू शकता.. दुकानातील विक्री चांगलीच वाढेल. आज तुम्ही मित्रांसोबत पार्टी आयोजित करू शकता.

**मकर**
आरोग्याशी संबंधित समस्यांपासून आराम मिळेल. क्षुल्लक गोष्टींवरून तुमच्या जोडीदाराला फटकारण्याऐवजी, त्यांना नम्रपणे गोष्टी समजावून सांगा,

**कुंभ**
तुमच्या वैवाहिक जीवनात आनंद येईल. आज घाईघाईमुळे चुका होऊ शकतात. ताण घेऊ नका, नीट काम करा. तुमचा राजकीय कामाचा ताण वाढू शकतो.

**मीन**
आज वैवाहिक कलह संपेल. वडीलधाऱ्यांचे लक्षपूर्वक ऐका आणि व्यत्यय आणू नका. लोक तुमची प्रशंसा करतील. लेखनात रस वाढेल.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# ठाण्यात शिंदे सेनेचे वर्चस्व

## ठाकरे गटाचा मतटक्का निम्म्यावर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

ठाणे, ता. १७ : ठाणे महापालिका निवडणुकीच्या निकालांनी एकनाथ शिंदे यांचा बालेकिल्ला अभेद्य असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. शिंदे सेनेने ठाणे पालिकेवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले असून, मतांच्या आकडेवारीतही मोठी आघाडी घेतली आहे. विशेष म्हणजे शिवसेना उद्धव ठाकरे गटाला शिंदे सेनेच्या तुलनेत निम्मी मते मिळाली असून, लोकमान्यनगर वगळता इतरत्र त्यांना अपेक्षित यश मिळालेले नाही. शिंदे गटाला १० लाख १८ हजार ४२५ मते मिळाली आहे, तर उद्धव ठाकरे गटाला चार लाख २४ हजार २१२ मते प्राप्त झाली आहेत. या निवडणुकीत उद्धव ठाकरे पक्षाला अपेक्षित यश मिळाले नसले, तरी शिंदेंच्या बालेकिल्ल्यात उमेदवार निवडून आणण्यात यश आले आहे. ठाणे महापलिकेच्या निवडणुकीची धामधूम मागील १२ ते १५ दिवसांपासून सुरू होती. 'आवाज कुणाचा' अशा घोषणा देत सर्वच राजकीय पक्षांच्या उमेदवारांकडून प्रचाराचा धुरळा उडवून देण्यात आला. अशातच उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांचे मनोमिलन झाल्यानंतर आणि १० वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर ठाणे पालिकेची निवडणूक पार पडली. या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांनी राज ठाकरे आणि राष्ट्रवादी शरद पवार पक्ष आघाडी करीत निवडणुकीला सामोरे गेले. दुसरीकडे शिंदे सेना व भाजप युती करीत रिंगणात उतरले होते. त्यामुळे महायुती विरुद्ध आघाडी असा सामना रंगल्याचे काही प्रभागांत प्रचारादरम्यान दिसून आले. ठाणे पालिकेत स्थापनेपासून शिवसेनेची सत्ता आहे. अशातच शिवसेनेत उभी फूट पडल्यानंतर ठाणे पालिकेची पहिलीच निवडणूक असल्याने त्यासाठी शिंदे सेनेसह ठाकरे गटानेदेखील ताकद पणाला लावल्याचे चित्र होते.

दरम्यान, या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सभा घेण्याऐवजी प्रचार रॅली, बाइक रॅली काढण्यावर भर दिला. तर शिवसेना ठाकरे गट व मनसेने ठाकरे बंधूंच्या सभेचे आयोजन केले होते. त्यामुळे ठाणे पालिका निवडणुकीत परिवर्तन होईल, अशी अपेक्षा दोन्ही पक्षांतील नेत्यांनी व्यक्त केली होती; मात्र शिंदे सेनेने विरोधकांचे मनसुबे धुळीस मिळवीत ठाणे पालिकेवर निर्विवाद वर्चस्व प्रस्थापित केले. दुसरीकडे दोन्ही शिवसेनांना मिळालेल्या मतांचा विचार केल्यास शिवसेना उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला शिंदे सेनेच्या तुलनेत निम्मी मते मिळाल्याचे दिसून आले आहे.

**लोकमान्य, माजिवडा आणि कोपरी**

ठाणे महापलिका निवडणुकीत शिंदे सेनेला उद्धव ठाकरे गटाने कडवी झुंज दिल्याचे दिसून येत आहे. यामध्ये लोकमान्यनगर प्रभागातून ठाकरे सेनेला सर्वाधिक एक लाख ८ हजार ६६४ मते मिळाली असून, त्यापाठोपाठ माजिवडा प्रभागातून ६७ हजार ८५८ तर, कोपरी नौपाडा प्रभागातून ६२ हजार ७४८, उथळसर ५१ हजार ६१३ मते मिळाली असल्याची माहिती आकडेवारीवरून समोर आली आहे.

# माजी महापौरांच्या जयंतीदिनीच कार्यकर्त्यांनी त्यांच्या पत्नीला निवडून आणत वाहिली श्रद्धांजली

## दिवंगत माजी महापौर राजेंद्र देवळेकर यांच्या पत्नी अनघा देवळेकर विजयी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : दिवंगत माजी महापौर राजेंद्र देवळेकर यांच्या पत्नी अनघा देवळेकर या प्रभाग क्र. 2 ब मधून विजयी झाल्या असून शुक्रवारी राजेंद्र देवळेकर यांच्या जयंतीदिनीच कार्यकर्त्यांनी त्यांच्या पत्नीला निवडून आणत अनोखी श्रद्धांजली वाहिली आहे.



कल्याण डोंबिवली महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ मध्ये शुक्रवारी शिवसेना शिंदे गटाच्या विजयी उमेदवार अनघा देवळेकर ह्या अत्यंत भावूक झालेल्या दिसल्या त्याला कारण ही तसे होते. कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे माजी महापौर दिवंगत राजेंद्र देवळेकर यांनी मनपा मध्ये आपल्या कार्यचा ठसा उमटविला होता. सभागृहात त्यांची भाषणे, अभ्यासपूर्ण, वस्तूस्तितीला धरून असल्याने वक्तृत्वगुण अवगत होता. तळागाळातील जनतेशी नाळ असणारे ते व्यक्तीमत्व होते. शुक्रवारी निकालांच्या दिवशी शिवसेना शिंदे गटातून त्यांच्या पत्नी अनघा देवळेकर या प्रभाग २ब मधून ३०९४ इतक्या प्रचंड मताधिक्याने विजयी झाल्याचे पाहता त्याक्षणी त्या अत्यंत भावूक झालेल्या आणि डोळे पाणावले होते.

शुकवारी दिवंगत राजेंद्र देवळेकर यांचा जयंती दिन होता. भारवलेल्या अनघा देवळेकर यांनी निवडणूक विजय प्रमाणपत्र हाती घेत घरी येत. राजेंद्र देवळेकर यांच्या आईच्या हाती देत तो विजय त्यांना समर्पित केला. या क्षणी उपस्थित शिवसैनिक, महिला आघाडी कार्यकर्त्या, युवा सैनिक आणि तळागाळातील नागरिकांनी देवळेकर यांच्या आठवणीला उजाळा देत असल्याचे चित्र यानिमित्ताने दिसत होते. यावेळी संतोष देवळेकर, उपशहरसंघटक नितीन जाधव, विभाग प्रमुख अंकुश केणे, शाखाप्रमुख भावेश अवसरे, प्रसाद कोलते, रवींद्र मोरे, संदीप जाधव, प्रमोद कोलगंटे, प्रवीण खराटे, रमेश घोपे आदींसह सर्व वरिष्ठ नागरिक संघ सदस्य उपस्थित होते.

# एप्रिलपासून पीएफ पैसे यूपीआयने थेट काढता येणार

**५ लाख मर्यादा**

**८ कोटी जणांना दिलासा**

**२५% रक्कम खात्यात आवश्यक**

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी दिल्ली:** कर्मचारी भविष्य निधी संघटनेने (ईपीएफओ) आपल्या ८ कोटी सभासदांना नवीन वर्षाची मोठी भेट दिली आहे. आता पीएफचे पैसे काढण्यासाठी कार्यालयाचे उंबरठे झिजवण्याची किंवा क्लिष्ट ऑनलाइन अर्जाची प्रतीक्षा करण्याची गरज उरणार नाही. येत्या एप्रिल महिन्यापासून कर्मचारी थेट यूपीआयद्वारे आपल्या पीएफ खात्यातून पैसे काढू शकणार आहेत. ही रक्कम अवघ्या काही मिनिटांत थेट बँक खात्यात जमा होईल.

### काय आहे नेमकी नवी सुविधा ?

सध्या पीएफ काढण्यासाठी दावा दाखल करावा लागतो, ज्यासाठी किमान ३ ते ७ दिवसांचा कालावधी लागतो. मात्र, नव्या प्रणालीत कर्मचारी आपल्या 'यूपीआय पिन' चा वापर करून सुरक्षितपणे व्यवहार करू शकतील.

यासाठी ईपीएफओ सध्या सॉफ्टवेअरमधील तांत्रिक त्रुटी दूर करण्याचे काम करत आहे.

### आजार, शिक्षण, लग्नासाठी काढा पैसे

यापूर्वी ऑटो-सेटलमेंट प्रक्रियेची मर्यादा १ लाख रुपये होती, ती आता वाढवून ५ लाख रुपये करण्यात आली आहे. आजारपण, शिक्षण, लग्न किंवा घर खरेदी यांसारख्या तातडीच्या गरजांसाठी कर्मचारी ही रक्कम झटपट मिळवू शकतील.

# उल्हासनगरमध्ये त्रिशंकू निकाल

## सत्ता स्थापनेसाठी राजकीय हालचालींना वेग

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**उल्हासनगर** : उल्हासनगर महानगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल आज जाहीर झाला असून, या निकालाने शहराच्या राजकारणात प्रचंड अनिश्चितता निर्माण केली आहे. ७८ जागांच्या महापालिकेत कोणत्याही पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने सत्ता स्थापनेसाठी आता राजकीय हालचालींना वेग आला आहे. बहुमतासाठी आवश्यक असलेला ४० जागांचा आकडा कुणालाच गाठता न आल्याने उल्हासनगरचा कौल सध्या लटकलेला आहे.

या निवडणुकीत भाजपने ३७ जागांवर विजय मिळवत पहिल्या क्रमांकावर मजल मारली, तर शिवसेना (शिंदे गट) ३६ जागांवर दुसऱ्या क्रमांकावर राहिली. वंचित बहुजन आघाडीला २, काँग्रेसला १, स्थानिक साई पक्षाला १, तर १ अपक्ष उमेदवार विजयी झाला आहे. विशेष म्हणजे शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आणि मनसे या दोन्ही पक्षांचा एकही उमेदवार निवडून आला नाही.

**मतमोजणी केंद्रावर तणावाचे वातावरण**

सकाळपासूनच मतमोजणी केंद्र परिसरात प्रचंड गर्दी होती. प्रत्येक फेरीचा निकाल लागल्यानंतर आघाडी-पिछाडीचे चित्र बदलत असल्याने उमेदवार, कार्यकर्ते आणि समर्थकांमध्ये तणाव स्पष्टपणे दिसून येत होता. काही ठिकाणी विजयाचा जल्लोष, तर काही ठिकाणी शांत निराशा पाहायला मिळाली. सोशल मीडियावर आकड्यांची देवाणघेवाण, फोनाफोनी आणि चर्चांचे फड दिवसभर रंगले होते.

**महापौरपदासाठी राजकीय गणिते**

महापौरपदासाठी बहुमताचा आकडा गाठता न आल्याने आता खरी राजकीय कसोटी सुरू झाली आहे. भाजपकडून सर्वाधिक जागा मिळाल्याचा दावा करत महापौरपदावर दावा केला जात आहे. मात्र, सत्ता स्थापन करण्यासाठी वंचित, अपक्ष आणि स्थानिक पक्षांचा पाठिंबा निर्णायक ठरणार आहे. भाजप-शिंदे गट युतीची शक्यता, तसेच पर्यायी सत्तासमीकरणांची चर्चा शहरात जोर धरू लागली आहे.

**पुढील घडामोडींकडे लक्ष**

या निकालानंतर उल्हासनगरच्या राजकारणात स्पष्ट बहुमताऐवजी अनिश्चितता, वाटाघाटी आणि सौदेबाजीचे राजकारण सुरू झाले आहे. येत्या काही दिवसांत बंद दरवाजाआड होणाऱ्या बैठका, अचानक बदलणाऱ्या भूमिका आणि युती-आघाडीचे निर्णय शहराचे भवितव्य ठरवणार आहेत. आजच्या निकालाने एक गोष्ट मात्र स्पष्ट केली आहेउल्हासनगरमध्ये सत्ता स्थापनेसाठीची खरी लढाई आता सुरू झाली आहे.

# 'खुल्या प्रवर्गातील जागा हा कोटा नाही'

## सर्वोच्च न्यायालय

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**नवी दिल्ली** : सामान्य श्रेणीसाठी असलेल्या कटऑफपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या राखीव प्रवर्गातील उमेदवारांना खुल्या असलेल्या जागांमध्ये सामावून घेतले पाहिजे, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. खुल्या प्रवर्गातील जागा या सामान्य श्रेणीतील उमेदवारांसाठी दिलेला कोटा नाही. तो एक खुला गट आहे. जेव्हा राखीव श्रेणीतील उमेदवार सामान्य उमेदवारांपेक्षा चांगली कामगिरी करतो, तेव्हा त्यांना खुल्या गटातील उमेदवार म्हणून विचारात घ्यायला हवे, असेही न्यायालयाने स्पष्ट केले.

# ठाण्यात बंडखोरीला मतदारांचा नकार

## १९ पैकी १८ अपयशी

**दै.ठाणे जीवनदीप वार्ता प्रतिनिधी / दि. १७ (ठाणे) :** ठाणे महापालिका निवडणुकीत बंडखोरीचा मार्ग स्वीकारलेल्या उमेदवारांना ठाणेकर मतदारांनी स्पष्ट संदेश दिला आहे. पक्षीय शिस्त मोडून अपक्ष म्हणून निवडणूक लढवलेल्या बहुतांश बंडखोर उमेदवारांना मतदारांनी नाकारत संघटनात्मक निर्णयालाच प्राधान्य दिले आहे. शिवसेना (शिंदे गट) आणि भाजपच्या महायुतीनंतर उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या एकूण १९ आजी-माजी नगरसेवक व इच्छुकांनी अपक्ष म्हणून रिंगणात उतरण्याचा निर्णय घेतला होता. मात्र त्यापैकी तब्बल १८ उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला असून, प्रमिला मुकुंद केणी या एकमेव बंडखोर उमेदवार विजयी ठरल्या आहेत.

महापालिका निवडणुकीपूर्वी शिंदे गट आणि भाजप स्वतंत्र लढतील, अशी अपेक्षा स्थानिक कार्यकर्त्यांमध्ये होती. मात्र ऐनवेळी वरिष्ठ पातळीवर महायुतीचा निर्णय झाल्याने अनेक इच्छुकांची उमेदवारी कापली गेली. याचा परिणाम म्हणून शिवसेना (शिंदे गट) मधील ११ आणि भाजपमधील ७ इच्छुकांनी बंडखोरी करत अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केले. मात्र निवडणूक निकालांनी मतदारांची भूमिका स्पष्ट केली आहे.

दरम्यान, प्रभाग क्रमांक २३ मधून उमेदवारी नाकारल्यानंतर प्रमिला मुकुंद केणी यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली. मतमोजणीत त्यांनी मोठ्या मताधिक्याने विजय मिळवून बंडखोरांमध्ये एकमेव यशस्वी उमेदवार ठरण्याचा मान मिळवला. त्यांच्या विजयातून स्थानिक जनसंपर्क, वैयक्तिक विश्वास आणि प्रभागातील पकड निर्णायक ठरल्याचे स्पष्ट झाले आहे.

**स्वतंत्र विश्लेषण**

ठाणे महापालिका निवडणुकीचा हा निकाल केवळ विजय-पराभवापुरता मर्यादित नसून, तो ठाण्यातील मतदारांची राजकीय मानसिकता स्पष्ट करणारा आहे. बंडखोरी ही नाराजीची अभिव्यक्ती असली, तरी ती मतदारांच्या विश्वासाची हमी नसते, हे या निकालातून अधोरेखित झाले आहे. पक्षीय तिकीट न मिळाल्याने थेट अपक्ष मैदानात उतरणाऱ्या उमेदवारांना मतदारांनी फारसा पाठिंबा दिला नाही.

मतदारांनी या निवडणुकीत संघटना, पक्षीय निर्णय आणि स्थैर्याला महत्त्व दिल्याचे दिसते. "पक्षापेक्षा मी मोठा" ही भावना मतपेटीत चालत नाही, असा अप्रत्यक्ष संदेश या निकालातून मिळतो. दुसरीकडे, प्रमिला केणी यांचा विजय हा अपवाद ठरतो, जो वैयक्तिक जनाधार, दीर्घकालीन संपर्क आणि स्थानिक विश्वासाच्या बळावर शक्य झाला आहे.

हा निकाल राजकीय पक्षांसाठीही आत्मपरीक्षणाचा विषय आहे. उमेदवार निवड प्रक्रियेत संवादाचा अभाव राहिल्यास बंडखोरी निर्माण होते; मात्र त्याला जनतेची मान्यता मिळेलच असे नाही. तसेच इच्छुक उमेदवारांसाठीही हा निकाल इशारा देणारा आहे की, पक्षशिस्त मोडून घेतलेला निर्णय नेहमीच फायदेशीर ठरेल, असे नाही.

एकूणच, ठाणेकर मतदारांनी बंडखोरीपेक्षा संघटनात्मक राजकारणालाच पसंती दिली असून, स्थैर्य आणि शिस्त यालाच लोकशाहीत खरे महत्त्व आहे, हे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.

# "भिवंडी राजकारणात सपा पिछाडीवर समीकरणे बदलली"

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**भिवंडी** : महापालिका निकालानंतर शहरातील राजकारणात मोठे बदल होणार असून विधानसभा निवडणुकीनंतर प्रमुख पक्ष बनलेला व महापालिकेत सत्ता स्थापनेचा दावा करणाऱ्या समाजवादीची अंतर्गत वादामुळे वाताहात झाली आहे. भिवंडी पूर्व विधानसभा समाजवादीकडे असून या विधानसभेत आ. रईस शेख व आ. अबू आझमी यांचे तिकीट वाटपावरून वाद झाला होता. हा वाद टोकाला गेल्याने शेख यांनी आपल्या कार्यकर्त्यांना काँग्रेसमधून तिकीट दिल्याने पूर्वेत समाजवादीचा एकही उमेदवार निवडून आलेला नाही. शेख यांच्या बंडखोरीमुळे आझमी हे शेख यांच्यावर कारवाईच्या तयारीत आहेत, त्यामुळे पक्षाच्या
राज्य, केंद्रात सत्तेत असलेल्या भाजप-शिंदेसेनेला हवा तसा निकाल लागला नसल्याने नकळत युतीच्या हातून महापालिका निसटली आहे. कारवाईला शेख यांना सामोरे जावे लागणार आहे.राष्ट्रवादी (शरद पवार) ला या निवडणुकीत १२ जागा मिळाल्याने राष्ट्रवादी (शरद पवार) शहरात प्रभावी बनली असून शहरात राष्ट्रवादी (शरद पवार) चे खा. सुरेश म्हात्रे यांची ताकद वाढली असून मनपा प्रशासनातही खा. म्हात्रे हस्तक्षेप करतील. ज्याचा फायदा म्हात्रे यांना होऊ शकतो. भिवंडी पश्चिममधून सलग तीनदा निवडून आलेले आ. महेश चौघुले यांनी प्रभाग १ मध्ये प्रतिष्ठेच्या केलेल्या लढाईत भाजपला हार पत्करावी लागली.

# मीरा भाईंदरचे महापालिकेचे २३ माजी नगरसेवक पराभूत

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मीरारोड** : यंदाच्या निवडणुकीत उभ्या असलेल्या २३ माजी नगरसेवकांचा पराभव झाला आहे. निवडणुकीत अनेक माजी नगरसेवकांना पराभव पत्करावा लागला आहे. शिंदेसेनेचे माजी विरोधी पक्षनेते आणि जिल्हा प्रमुख राजू भोईर यांचा भाजपच्या नवीन सिंग यांनी पराभव केला. आमदार नरेंद्र मेहता यांनी जाहीरपणे राजू भोईर यांचा पराभव करणार, असे आव्हान मंत्री प्रताप सरनाईक यांना दिले होते.

राजू सह त्यांच्या पत्नी भावना आणि भाऊ कमलेश हे माजी नगरसेवक देखील हरले. माजी उपमहापौर प्रवीण पाटील आणि माजी विरोधी पक्षनेते धनेश पाटील यांना भाजपा उमेदवारांनी पराभूत केले. शिंदेसेनेच्या तारा घरत, संध्या पाटील, दिनेश नलावडे पराभूत झाले आहेत. भाजपच्या प्रभाग १४ मधील मीरादेवी यादव यांना पराभूत करून भाजपचे बंडखोर अपक्ष अनिल भोसले यांनी दणक्यात विजय मिळवला आहे. शिंदेसेनेच्या माजी महापौर कॅटलीन परेरा यांना प्रभाग ८ मधून पराभूत करण्याची किमया ही सुहास रकवी ह्या भाजपच्या तरुणीने करून दाखवली आहे. उद्धवसेनेच्या माजी गटनेत्या नीलम ढवण यांचा भाजपाच्या योगिता शर्मा यांनी पराभव केला.

# ठाण्यात उड्डाणपुलासाठी अवजड वाहनांवर बंदी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : घोडबंदर येथील गायमुख चौपाटी परिसरात उड्डाणपुलाच्या उभारणीसाठी खांबांवर पूर्वनिर्मीत लोखंडी चौकट बसविण्यात येणार आहे. या कामामुळे परिसरातील वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी ठाणे वाहतूक पोलिसांनी अवजड वाहतूक बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयानुसार रविवार सकाळी ७ ते दुपारी १ वाजेपर्यंत घोडबंदर मार्गावर अवजड वाहतूकीला बंदी असणार आहे. ही वाहतूक पर्यायी मार्गांवरून वळविण्यात येणार असल्याने या मार्गांवर कोंडी होण्याची शक्यता आहे.

घोडबंदर मार्गावरून दररोज मोठ्या प्रमाणात अवजड वाहनांची वाहतूक होत असते. तसेच गायमुख चौपाटी परिसरात पर्यटनासाठीही मोठ्या संख्येने नागरिक येतात. या ठिकाणी नागरिकांना रस्ता ओलांडणे शक्य होत नाही. यामुळे गायमुख चौपाटी परिसरात उड्डाणपुल उभारण्यात येत आहे.

४८ मीटर लांब, ३.८० मीटर रुंद आणि ४ मीटर उंच असा हा उड्डाणपुल असणार आहे. या उड्डाणपुलाच्या उभारणीसाठी पदपथावर दोन्ही बाजूला खांब उभारण्यात आले आहेत. या खांबांवर पूर्वनिर्मीत लोखंडी चौकट बसविण्यात येणार आहे. या कामामुळे वाहतूक कोंडी होण्याची शक्यता लक्षात घेऊन ठाणे वाहतूक शाखेचे पोलीस उपायुक्त पंकज शिरसाट यांनी वाहतूक बदल लागू केले आहेत. यानुसार रविवार सकाळी ७ ते दुपारी १ वाजेपर्यंत घोडबंदर मार्गावर अवजड वाहतूकीला बंदी असणार आहे. ही वाहतुक पर्यायी मार्गांवरून वळविण्यात येणार आहे.

# शिक्षक-पालकांसाठी 'सुजाण पालकत्व' मार्गदर्शन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**टोकावडे** : विद्यार्थ्यांच्या मानसिक, बौद्धिक; तसेच नैतिक विकासासाठी पालक आणि शिक्षकांची भूमिका अधिक सक्षम व सकारात्मक व्हावी, या उद्देशाने 'पालक व सर्व शिक्षकांसाठी सुजाण पालकत्व' या विषयावर विशेष मार्गदर्शनपर कार्यशाळा घेण्यात आली. मनशक्ती प्रयोग केंद्र, लोणावळा आणि जनसेवा शिक्षण मंडळ, मुरबाड यांच्या संयुक्त विद्यमाने ही कार्यशाळा शनिवारी (ता. १७) शिवळे विद्यामंदिर हायस्कूल येथील सभागृहात पार पडली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जनसेवा शिक्षण मंडळाचे सहसचिव भास्कर हरड यांनी केले. शिक्षक अध्यापन करतो, विद्यार्थी अध्ययन करतो आणि या दोघांवरही दररोज मानसिक ताण येत असतो. हा ताण कमी करून शिक्षक व विद्यार्थ्यांना मानसिक समाधान मिळावे, यासाठीच अशा संस्कारक्षम उपक्रमांचे आयोजन आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. कार्यशाळेचे प्रमुख मार्गदर्शक अजित फापाळे यांनी बालकांच्या व्यक्तिमत्त्व विकासात शिक्षकांची भूमिका, पालकांची जबाबदारी आणि सुजाण पालकत्वाचे महत्त्व यावर सखोल व प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ शैक्षणिक प्रगती पुरेशी नसून विद्यार्थ्यांचा मानसिक समतोल, भावनिक स्थैर्य आणि नैतिक मूल्यांची जपणूकही तितकीच महत्त्वाची आहे. पालक व शिक्षकांनी परस्पर समन्वय राखून काम केल्यास विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य होऊ शकतो, असा मोलाचा संदेश त्यांनी दिला. मंडळाचे सहसचिव भास्कर हरड, संचालक बी. एम. पवार, प्राचार्य मनोहर इसामे, प्राचार्य डॉ. बडगुजर, उपप्राचार्य गीता विशे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111



# राष्ट्रीय सेवा योजना विभागाची रस्ते सुरक्षा अभियान मोहीम.

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

जीवनदीप महाविद्यालयात सक्रिय असणारा राष्ट्रीय सेवा योजना विभाग हा नेहमीच समाज उपयोगी प्रबोधनपर कार्यक्रम राबवत असतो. शुक्रवार दिनांक १६- ०१- २०२६ रोजी NSS व IQAC यांच्या संयुक्त विद्यमाने रस्ते सुरक्षा अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये स्वयंसेवकांनी गोवेली गावात जाऊन रस्ते जनजागृती करिता पथनाट्याचे सादरीकरण केले तसेच पथनाट्य दरम्यान सामूहिक प्रतिज्ञा नागरिकांकडून वदवून घेतली. सदर कार्यक्रमाला जीवनदीप संस्थेचे अध्यक्ष. रविंद्र घोडविंदे, संचालक. प्रशांत घोडविंदे, प्राचार्य डॉ अशोक वाघ, उपप्राचार्य. हरेंद्र सोष्टे , यांचे मोलाचे सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. दिनेश धनगर, प्रा. धनश्री नाईक, NSS लीडर स्वयंसेवक प्राध्यापक कर्मचारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले व सदर अभियान यशस्वीरित्या पार पडले.



# वैश्य समाजाच्या एकीचा विजय



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**वाशिंद** : भिवंडीत महापालीकेच्या निवडणूकीत रोमा आळशी यांचा विजय. भिवंडीत वैश्य समाजाच्या एकीचा विजय झाला आहे.

महाराष्ट्रात १५ जानेवारी रोजी झालेल्या २९ महानगरपालीकेच्या निवडणूकीचा निकाल १६ जानेवारी रोजी जाहिर करण्यात आला. या निवडणूकीत भिवंडी महानगरपालीकेत रोमा निलेश आळशी ह्या भिवंडी विकास आघाडीतून निवडणूक लढवीत होत्या. भिवंडी शहरात वैश्य वाणी समाजाची मोठ्या प्रमाणात राजकीय पकड आहे. या पकडीच्या जोरावर अनेक वैश्य बांधवानी महानगर पालिकेवर अनेक पद भुषवली आहेत. समाज जरी एकवटलेला असला तरी निवडणूकीत तो एक मेका विरोधात लढत असतो. मात्र याला अपवात भिवंडी शहरातील वैश्य समाजाने ही प्रथा मोडीस काढीत पक्ष भेद बाजूला ठेवत रोमा आळशी या एकमेव उमेदवार देऊन एकीचे बळ दाखवून दिले. या निवडणूकीत रोमा आळशी यांना भिवंडी विकास आघाडीचे माजी महापौर जावेद दळवी यांची ताकत मिळाल्याने रोमा आळशी याच्या बरोबरच याच आघाडीचे जावेद दळवी, रिषिका राका या विजयी झाल्या आहेत.

**समाजाने व मतदारांनी दाखविल्या विस्वासाला तडा जाऊ न देता सर्वांना बरोबर घेऊन विकासाची कामे करण्याचा विस्वास मी देते.**
**- रोमा आळशी,**
**नवनिर्वाचित नगरशेवीका, भिंवडी.**

# केडीएमसी निवडणुकीत अवघ्या 6 मतांनी मिळवला विजय

## तर एकाला मिळाले तब्बल 14 हजारांचे मताधिक्य

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण–डोंबिवली महानगरपालिकेच्या निवडणुकीत काही प्रभागांमध्ये प्रचंड मताधिक्याने विजय तर काही ठिकाणी अत्यल्प मतांनी निकाल लागल्याचे चित्र समोर आले आहे. मतमोजणीअंती जाहीर झालेल्या आकडेवारीनुसार सर्वाधिक आणि अत्यल्प विजयी मताधिक्याचे निकाल समोर आले आहेत.

यामध्ये केडीएमसीच्या प्रभाग क्र. 16 अ मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार निलेश खंबायत यांचा अवघ्या 6 मतांनी विजय झाला आहे. त्यांनी शिवसेनेच्या श्वेता जाधव यांचा पराभव केला आहे. प्रभाग क्र. 4 क मध्ये शिवसेनेच्या नमिता मयूर पाटील 8 मतांनी विजय झाल्या असून त्यांनी ठाकरे गटाच्या रूपा दया शेट्टी यांचा पराभव केला आहे. प्रभाग क्र. 8 ब मध्ये काँग्रेसच्या समीना सलीम शेख यांचा 38 मतांनी विजय झाला असून त्यांनी अपक्ष उमेदवार अलिजा मुज्जमिल खोत यांना पराभूत केले आहे. प्रभाग क्र. 10 ब मध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विशाल गारवे 172 मतांनी विजयी झाले असून त्यांनी शिवसेनेचे माजी नगरसेवक विद्याधर भोईर यांचा पराभव केला. तर प्रभाग क्र. 15 क मध्ये शिवसेनेच्या माधुरी प्रशांत काळे यांचा 293 मतांनी विजय झाला असून त्यांनी मनसेच्या प्रभाकर गायकवाड यांचा पराभव केला आहे.

तर सर्वाधिक मताधिक्य मिळविणाऱ्यांमध्ये प्रभाग क्र. 1 ड मधील शिवसेनेच्या जयवंत भोईर यांना 14 हजार 107 मतांचे मताधिक्य मिळाले असून त्यांनी ठाकरे गटाच्या निलेश भोर यांचा पराभव केला आहे. त्यापाठोपाठ प्रभाग क्र. 20 क भाजपाच्या खुशबू पद्माकर चौधरी यांना 13 हजार 28 मतांचे मताधिक्य मिळाले असून त्यांनी वंचित बहुजन आघाडीच्या अस्मिता गौतम सरवदे यांचा पराभव केला आहे. प्रभाग क्र. 31 ड मध्ये शिवसेनेचे गजानन मोतीराम पाटील यांना 12 हजार 718 मतांचे मताधिक्य प्राप्त झाले असून त्यांनी मनसेच्या निवृत्ती चंद्रकांत पाटील यांना पराभूत केले आहे. प्रभाग क्र. 18 क मध्ये शिवसेनेचे नविन गवळी यांना 12 हजार 55 मतांचे मताधिक्य मिळाले असून त्यांनी मनसेचे महेंद्र कुंदे यांचा पराभव केला आहे. तर प्रभाग क्र. 26 ड मध्ये भाजपाच्या मंदार श्रीकांत हळबे यांनी 11 हजार 948 मतांचे मताधिक्य मिळविमले असून त्यांनी मनसेच्या प्रतिक मारू यांना पराभूत केले.

या निकालांवरून केडीएमसी निवडणुकीत काही प्रभागांमध्ये पक्षांना स्पष्ट बहुमत मिळाल्याचे दिसते, तर काही ठिकाणी चुरशीच्या लढतीत अवघ्या काही मतांनी निकाल ठरले. यामुळे आगामी काळात स्थानिक राजकारणात रणनीती, संघटन आणि जनसंपर्कावर अधिक भर दिला जाईल, असा राजकीय जाणकारांचा अंदाज आहे.

# नवनिर्वाचित नगरसेविका स्वप्नाली विनोद केणे यांनी घेतली राज ठाकरे यांची भेट



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता /कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत कल्याण मधील प्रभाग क्र. 6 मध्ये उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे चारही नगरसेवक निवडून आले आहेत. यामध्ये 6 क मध्ये स्वप्नाली विनोद केणे यांनी विद्यमान नगरसेविका शिवसेनेच्या कस्तुरी देसाई यांचा पराभव केला आहे. स्वनाली या महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे शहर अध्यक्ष विनोद केणे यांच्या पत्नी असून त्यांनी मशाल या निवडणूक चिन्हावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातर्फे निवडणूक लढवत विजय प्राप्त केला. या विजयानंतर केणे दांपत्यानी राज ठाकरे यांची भेट घेतली. यावेळी शर्मिला ठाकरे यांनी दोघांचे औक्षण केले. मिळालेल्या या यशाबद्दल राज ठाकरे यांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

# मराठी विकिपीडिया हे मुक्त ज्ञानाचे भांडार – विकास कांबळे

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण : राज्य मराठी विकास संस्था महाराष्ट्र शासन मुंबई आणि मराठी विभाग बी.के बिर्ला महाविद्यालय कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी विकिपीडिया परिचयात्मक कार्यशाळेचे आयोजन बी.के. बिर्ला महाविद्यालय कल्याण येथे आयोजित करण्यात आले होते. या कार्यशाळेला मार्गदर्शक म्हणून राज्य मराठी विकास संस्थेचे प्रकल्प साहाय्यक विकास कांबळे उपस्थित होते.**



या कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी मराठी विकिपीडिया विषयी माहिती देताना विकास कांबळे म्हणाले की, "मराठी भाषेतील कोणतीही माहिती शोधण्यासाठी विश्वकोशाची मदत घ्यावी लागत होती. विविध कोश किंवा विश्वकोशाचे खंड हाताळणे जिकिरीचे झाले होते. आज तंत्रज्ञानाच्या युगामध्ये कोणतीही माहिती शोधताना संगणकाचा उपयोग केला जात आहे. मराठी भाषेतील माहिती शोधताना मराठी विकिपीडिया उपयोग संशोधक अभ्यासक करत आहेत. मराठी विकिपीडिया हे मुक्त ज्ञानाचे भांडार आहे."असे प्रतिपादन शासनाच्या राज्य मराठी विकास संस्थेचे प्रकल्प साहाय्यक विकास कांबळे यांनी व्यक्त केले. 'या कार्यक्रमाचे अध्यक्ष उपप्राचार्य डॉ.महादेव यादव यांनी नवीन तंत्रज्ञानाचे युगात अशा कार्यशाळा झाल्या पाहिजेत, तर विद्यार्थ्यांच्या कक्षा रुंदावतील असे मत व्यक्त केले. ही कार्यशाळा आपल्या महाविद्यालयात होत आहे. याबद्दल त्यांनी शासनाचे विशेष आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. सीताराम म्हस्के यांनी केले. यामध्ये त्यांनी कार्यशाळेच्या उद्देशासोबतच विकिपीडिया विषयी सविस्तर माहिती सांगितली. या कार्यक्रमात मोडिलिपी सहाय्यक योगेश सावंत यांनीही विद्यार्थ्यांना विकिपीडिया संदर्भातील प्रात्यक्षिक स्वरूपात मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मल्हारी मसलखांब यांनी केले.

कार्यक्रमासाठी डॉ. अनुप्रिया खोब्रागडे, डॉ. भाऊसाहेब ननावरे, प्रा. प्रेरणा जगताप, प्रा. रिद्धीसिध्दी गायकवाड व हिंदी विभाग प्रमुख बालकवी लक्ष्मण सुरंजे व प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाच्या संयोजनासाठी डॉ .दौलतराव कांबळे व मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. कल्याण परिसरातील विविध महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. शेवटी आभार डॉ. मनीषा पाटील यांनी मानले.

# डॉ. प्रमोद नांदगावकर यांना रेड स्वस्तिक सोसायटीचा "सारथी पुरस्कार"

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** मानवतेसाठी समर्पित आरोग्य व सामाजिक क्षेत्रात गेल्या २५ वर्षापासून अखिल भारतीय तसेच आतंरराष्ट्रीय स्तरावर काम करणाऱ्या रेड स्वस्तिक सोसायटी या स्वयंसेवी संस्थेचा २५ वा वर्धापन दिन सोहळा राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती च्या दिवशी नुकताच नाशिक येथे संपन्न पडला. यामध्ये संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या वर्ष २०२५ मधील प्रतिष्ठेचा "सारथी पुरस्कार" टिटवाळा, कल्याण येथील डॉ. प्रमोद नांदगावकर यांना प्रदान करण्यात आला.



रेड स्वास्तिक सोसायटी ही संस्था समाजिक, आरोग्य सेवा देण्यासाठी संपूर्ण भारतामध्ये आणि इतर देशांमध्ये निस्वार्थपणे मानवतेसाठी समर्पित आहे. संस्थेच्या या मानवतावादी कार्यास २५ वर्षे पूर्ण झाली असून आतापर्यंत 1 कोटी 25 लाख गरजूना फायदा झाला आहे या निमित्ताने संस्थेचा रौप्य महोत्सवी सोहळा नुकताच पार पडला. या सोहळ्यामध्ये संस्थेच्या माध्यमातून आरोग्य व सामाजिक क्षेत्रात आपल्या भागामध्ये काम करणाऱ्या व्यक्ती व संस्थाना दरवर्षी विविध पुरस्काराने सन्मानित केले जाते.

रेड स्वास्तिक सोसायटीच्या माध्यमातून आपल्या विभागामध्ये सामाजिक व आरोग्य क्षेत्रात भरीव योगदान देऊन कार्य निरपेक्षपणे व निस्वार्थपणे करणाऱ्या संस्थेच्या सदस्यांना सर्वोच्च सारथी पुरस्कार देऊन गौरव केला जातो. वर्ष २०२५ चा सारथी पुरस्कार डॉ. प्रमोद नांदगावकर यांना जाहिर करण्यात आला असून रौप्य महोत्सवी सोहळयामध्ये डॉ. भूषणकुमार उपाध्यय, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य (सेवानिवृत्त), स्नेहा कोकणे पाटील, मिस वर्ल्ड, मिस युनिव्हर्स, मिस एशिया, मिस इंडिया, इंटरनॅशनल बॉडी बिल्डर आणि वेट लिफ्टर, सुरेश कोते, अध्यक्ष रेड स्वास्तिक सोसायटी, हिंदुस्थान तथा व्यवस्थापकीय संचालक, लिज्जत पापड समुह, डॉ. टि. एस. भाल, संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक रेड स्वास्तिक सोसायटी, हिंदुस्थान तथा अतिरिक्त पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य (सेवानिवृत्त)यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

डॉ. प्रमोद नांदगावकर यांना सदर पुरस्कार त्यांच्या सामाजिक व आरोग्य क्षेत्रातील निस्वार्थ व उल्लेखनीय योगदानाबद्दल देण्यात आला आहे. डॉ. प्रमोद नांदगावकर हे "रेड स्वस्तिक सोसायटी" संस्थेच्या महाराष्ट्र राज्य जनसंपर्क संचालक तथा सह व्यवस्थापकीय संचालक, हिंदुस्थान म्हणून सामाजिक कार्य पाहत आहेत. मुंबई, ठाणे, टिटवाळा, कल्याण व आसपासच्या परिसरात "ll सेवा ही धर्म है ll" हे ब्रीद मनाशी बाळगून समाजातील विशेषत: तळागाळातील, आदिवासी,दुर्गम भागातील जनतेला चांगले आरोग्य, चांगले जीवन लाभावे याकरिता गेल्या कित्येक वर्षापासून विविध व्यासपीठांचा आधार घेऊन आरोग्य व सामाजिक क्षेत्रात निरपेक्ष व निस्वार्थ भावनेने योगदान देत आहेत.

# सुनिल परटोले यांच्या प्रकल्पाची राज्यस्तरासाठी निवड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**शहापूर ग्रामीण( नरेंद्र पाटील) :** वासिंद जवळील जिल्हा परिषद शाळा कळमपाडा येथे कार्यरत असलेले प्राथमिक शिक्षक सुनिल परटोले यांनी सादर केलेल्या 'अपूर्णांकाच्या जगात ' या गणित विषयातील प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला असून त्यांची राज्यस्तरासाठी निवड झाली आहे.




ठाणे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे शहाड येथील सेंच्युरी रेयॉन हायस्कूल येथे 53 वे जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शन स्पर्धा नुकतीच पार पडली. या स्पर्धेत प्राथमिक विभागाचे 27, माध्यमिक विभागाचे 28 प्रकल्प, प्राथमिक शिक्षकांचे 10 व माध्यमिक शिक्षकांचे 11 शैक्षणिक साहित्य, प्रयोगशाळा परिचर 5 व दिव्यांग 4 असे 85 प्रकल्प जिल्हास्तरीय विज्ञान प्रदर्शनात मांडण्यात आले होते. तर या प्रदर्शनात 200 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

यामध्ये शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा कळमपाडा येथे कार्यरत असलेले प्राथमिक शिक्षक सुनिल परटोले यांनी सादर केलेल्या 'अपूर्णांकाच्या जगात ' या गणित विषयातील प्रकल्पाला प्रथम क्रमांक मिळाला असून त्यांची राज्यस्तरासाठी निवड झाली आहे.याआधी देखील त्यांनी दोन वेळा राज्यस्तरावर आपले प्रकल्प सादर केले होते. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतूक होत आहे. तर राज्यस्तरावरील विज्ञान प्रदर्शन श्री शिवाजी शिक्षण संस्था संचालित विज्ञान महाविद्यालय नागपूर येथे 28 जानेवारी ते 1 फेब्रुवारी 2026 या कालावधीत पार पडणार आहे. या निवड झालेल्या राज्यस्तरीय प्रकल्पासाठी तालुक्यातील शिक्षण विभागातून त्यांना भरभरून शुभेच्छा दिल्या जात आहेत व त्यांचे सर्व थरातून अभिनंदन होत आहे.

# ठाकरे गटाच्या नगरसेवकाने घेतली खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिका निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे 11 नगरसेवक निवडून आले असून यातील प्रभाग क्रमांक 13 मधून निवडून आलेले शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नगरसेवक मधुर म्हात्रे यांनी कालच शिवसेनेचे खासदार श्रीकांत शिंदे यांची भेट घेतल्याने चर्चेला उधाण आले आहे. खासदार श्रीकांत शिंदे यांच्या सोबत फोटो वायरल झाल्याने शिवसेना उद्धव पक्षाचे उमेदवार हे शिवसेनेच्या वाटेवरती असल्याची चर्चा रंगली आहे.



केडीएमसी निवडणुकीचा निकाल लागला असून सत्ता स्थापनेसाठी भाजपा आणि शिवसेना या दोन्ही पक्षांच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. अशातच ठाकरे गटाचे 11, मनसेचे 5, काँग्रेसचे 2 तर राष्ट्रवादी शरद पवार गटाचा 1 नगरसेवक निवडून आला आहे. त्यामुळे शिवसेना भाजपा या नगरसेवकांना आपल्या गळाला लावण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यातच मधुर म्हात्रे यांनी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांची भेट घेतल्याने विविध राजकीय चर्चा रंगल्या आहेत.

दरम्यान मधुर म्हात्रे हे याआधी शिवसेना शिंदे गटात कार्यरत होते मात्रऐन निवडणुकीत शिवसेनेने उमेदवारी न दिल्याने त्यांनी मशाल हाती घेत ठाकरे गटातून निवडणूक लढवली आणि विजयी देखील झाले. त्यामुळे आता मधुर म्हात्रे यांच्या पुढील राजकीय निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले असून याबाबत त्यांना संपर्क केला असता संपर्क झाला नाही.

# डॉ. प्रल्हाद वाघ 'युवा संशोधक पुरस्कार' ने सन्मानित

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : विद्या प्रसारक मंडळाचे बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालयातील प्राध्यापक डॉ. प्रल्हाद श्रीराम वाघ यांना इंटरनॅशनल जर्नल ऑफ मायक्रोबियल सायन्स यांच्या वतीने देण्यात येणारा सन २०२५- २६ साठीचा 'युवा संशोधक पुरस्कार दिनांक १६ जानेवारी रोजी त्यांच्या संशोधन क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल प्रदान करण्यात आला. डॉ. वाघ यांनी केलेल्या उत्कृष्ट संशोधन कार्यामुळे आंतरराष्ट्रीय स्तरावर त्यांची दखल घेण्यात आली असून



हा पुरस्कार त्यांच्या शैक्षणिक आणि संशोधन क्षेत्रातील योगदानाची पावती आहे.

या यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विंदा मांजरमकर, उपप्राचार्या मीनल वानखेडे, रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. अजित भुमकर तसेच सर्व अध्यापक व शिक्षकेतर सहकारी कर्मचाऱ्यांनी डॉ. प्रल्हाद वाघ यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांच्या या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.




Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024